विधानमंडळ/संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्याबाबत दि.२७ जुलै,२०१५ पासून दि.२० ऑगस्ट,२०२१ पर्यंत निर्गमित सर्व परिपत्रकांचे एकत्रीकरण-
सुधारीत, सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता,उत्कृष्टता आणि सुशासन)**
**शासन शुद्धिपत्रक क्र. जीएडी-३२०३६/४२/२०२५-जीएडी/रवका-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मुंबई-४०००३२.
दिनांक- २८ एप्रिल, २०२६.

**वाचा :-**

सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. जीएडी-३२०३६/४२/२०२५-जीएडी/रवका-१, दि.२० नोव्हेंबर, २०२५

**शासन शुद्धिपत्रक :-**

उपरोक्त "वाचा" येथील शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. १.२, "विधानमंडळ / संसद सदस्य भेटावयास येतेवेळी व भेट संपून परत जातेवेळी अधिकाऱ्यांनी त्यांना उत्थापन देऊन अभिवादन करावे" असा आहे. त्याऐवजी मुद्दा क्र. १.२ पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा-

"एखादा लोकप्रतिनिधी फौजदारी अथवा इतर प्रकरणात दोषी ठरला असल्यास, चौकशी / सुनावणीसाठी अपीलकार, पक्षकार म्हणून बोलाविण्यात आले असल्यास अथवा निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने (नामनिर्देशन अर्ज सादर करणे, छाननी, सुनावणी इत्यादी) शासकीय कार्यालयात उपस्थित राहिले असल्यास, अशा प्रसंगी विधानमंडळ / संसद सदस्य भेटावयास येतेवेळी व भेट संपून परत जातेवेळी अधिकाऱ्यांनी त्यांना उत्थापन देऊन अभिवादन करण्याची आवश्यकता नाही. अशा प्रसंगी संबंधित अधिकाऱ्यांनी कोणताही भेदभाव न करता, कायदा, नियम व परिस्थितीनुरूप सर्वसामान्य नागरिकांप्रमाणेच लोकप्रतिनिधींना वागणूक देणे अपेक्षित आहे."

२. सदर शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in प्रसिद्ध करण्यात येत असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२८११२६३५९३०७ असा आहे. तसेच सदर शुद्धिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJESH AGGARWAL
Digitally signed by RAJESH AGGARWAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=0F9F6000C9722E3E3367A238C3C33F8D5E290536523AEEC0B9FB859001D627C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=615B233854CCBEBA11F3E1FB5520E0111478DDF7A76032DC2D7F93E8824962C9, cn=RAJESH AGGARWAL
Date: 2026.04.28 15:16:48 +05'30'

(राजेश अग्रवाल)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,लोकभवन,मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई.

३) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
५) मा. उपमुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क,क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
९) सर्व मा. संसद सदस्य/विधानपरिषद सदस्य/ विधानसभा सदस्य.
१०) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई (त्यांच्या आधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह).
१२) पोलिस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१३) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१४) पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई.
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व पोलीस आयुक्त (पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई वगळून).
१८) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलिस महानिरीक्षक.
१९) सर्व जिल्हाधिकारी.
२०) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून).
२१) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
२२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

**प्रत-**

१) संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय,मुंबई (ई-ऑफिस सूचना फलक व सर्व शासकीय संकेतस्थळे येथे परिपत्रक प्रकाशित करण्याच्या विनंतीसह).
२) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) महासंचालक, यशदा, पुणे.
४) महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक.
५) निवडनस्ती (रवका-१).